# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.02.2026** **वार:शुक्रवार**

1. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी
2. छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग, हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
3. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आणि वापर जागतिक समुदायाच्या हितासाठी करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
4. राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात आणि
5. गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांनी उभारलेली 44 स्मारकं पोलिसांनी एकाच दिवसात केली उद्ध्वस्त

**शिवजयंती**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती काल देशासह राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी झाली. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवरायांना अभिवादन केलं. छत्रपती शिवाजी महाराज एक दूरदर्शी नेते, कुशल प्रशासक, विलक्षण रणनीतीकार आणि स्वराज्याचे पुरस्कर्ते होते, अशा शब्दात पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात छत्रपतींना मानवंदना दिली. राजधानी दिल्लीतही शिवजयंती उत्साहात साजरी झाली. भारतीय सेनेच्या तुकडीने छत्रपती शिवाजी महाराजांना विशेष मानवंदना दिली.

उत्तर प्रदेशातील आग्रा इथल्या ऐतिहासिक लाल किल्ल्यावरही शिवजयंतीच्या निमित्ताने 'शिवजन्मोत्सव भारतवर्ष का' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. शिवरायांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला प्रेरणेची, तर आग्र्याचा लाल किल्ला ही स्वाभिमानाची भूमी आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

मुंबईत दादरमधल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावरच्या महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याला राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी अभिवादन केलं. संपूर्ण राज्यातही शिवजयंतीचा काल मोठा उत्साह होता; ऐकुया त्याबाबतचा वृत्तांत....

**शिवजयंतीचा राज्यातला मुख्य शासकीय सोहळा महाराजांचं जन्मस्थान असलेल्या जुन्नरमधील शिवनेरी गडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात साजरा झाला.**

**छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी 2030मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची 400वी जयंती जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.....**

***शिवरायांची प्रेरणा आपण घेतो आणि म्हणून आवश्यक आहे त्यांनी दिलेल्या मार्गावरच आपल्याला चालावं लागेल त्यांनी दिलेला मार्ग हाच मार्ग विकासाचा मार्ग आहे तो प्रत्येकाच्या उत्थानाचा मार्ग आहे. मागच्या काळात आम्ही घोषणा केली होती या महाराष्ट्रातले शिवरायांचे सगळे किल्ले हे आम्ही अतिक्रमण मुक्त करू आणि आज मला सांगताना आनंद वाटतो पुणे जिल्ह्यातले सगळे किल्ले आता अतिक्रमणमुक्त झालेले आहेत.***

**क्रीडा मंत्रालयाच्या सहकार्यानं राज्यात विविध ठिकाणी 'मेरा युवा भारत' पदयात्रांचं आयोजन करण्यात आलं होतं. सातार्‍यात केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य सोहळा साजरा झाल झाला. या पदयात्रेत 12 हजारांहून अधिक शिवभक्त-शिवप्रेमी सहभागी झाले होते.**

**पुण्यात शिवजयंती महोत्सव समितीनं आयोजित केलेला शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा देखील मोठ्या उत्साहात पार पडला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सोहळ्याचं उद्घाटन झालं. पुण्यातील शिवाजीनगर इथल्या एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील शिवरायांच्या भव्य अश्वारुढ स्मारकावर यावेळी हेलीकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं होतं.**

**नागपूर मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनी किल्ल्याची एक सुंदर प्रतिकृती तयार केली होती. नागपुरमधील पालखी सोहळ्यात महिलांचं मुद्रा पथक हे मुख्य आकर्षण होतं.**

**भंडार्‍यात प्रसिद्ध रांगोळीकार भैरवी निर्वाण यांनी काढलेली शिवरायांची भव्य रांगोळी आणि अकोल्यातील 30 हजार चौरस फुटांची रांगोळी शिवभक्तांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदु ठरली. रत्नागिरीतील पदयात्रेमध्ये पोलीस पथकानं छत्रपती शिवरायांना विशेष सलामी दिली.**

**धाराशिव इथे राजकुमार कुंभार या कलाकारानं थ्रीडी आणि टू डी स्वरूपातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आकर्षक मूर्ती साकारल्या. तर सांगलीमध्ये किल्ले महोत्सवा आयोजन करण्यात आलं. बुलढाण्यातही अनोख्या पद्धतीने किल्ले तयार करून किल्ले संवर्धन करण्याचा संदेश देण्यात आला.**

**नाशिक, अहिल्यानगर, सोलापूरसह संपूर्ण राज्यात मिरवणुका, पोवाडे, साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, पदयात्रा अशा अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून शिवजयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमच्या ठीकठिकणच्या वार्ताहरांसह पुण्याहून संध्या खान.**

**<u>मोदी</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आणि वापर जागतिक समुदायाच्या हितासाठी झाला पहिजे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६चं औपचारिक उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं, असं मोदी म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराबद्दलही पंतप्रधानांनी महत्वाचे मुद्दे मांडले. या परिषदेच्या अनुषंगानं जगभरातल्या विविध देशांच्या प्रमुख नेत्यांशी पंतप्रधान मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली.

**<u>मुंबई क्लायमेट वीक</u>**

पर्यावरण तज्ज्ञांनी जागतिक पर्यावरण रक्षणाचा विचार करताना कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही विचार करावा, असं आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं. 'मुंबई क्लायमेट वीक'च्या समारोप कार्यक्रमात ते काल बोलत होते. राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मंत्री आशिष शेलार, मुंबईच्या महापौर रितू तावडे, आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. पर्यावरणविषयक परिषदांमधील चर्चा केवळ बौद्धिक पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे, अशी अपेक्षा पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली. मुंबई क्लायमेट वीकमुळे विविध देशांतील तज्ज्ञांशी विचारविनिमयाची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. शहराचा विकास, वाढ आणि हवामान विषयक जबाबदारी हे मुद्दे एकमेकांपासून वेगळे न ठेवता समांतर आणि समन्वयाने पुढे नेण्याची आवश्यकता असल्याचं रितू तावडे यांनी सांगितलं.

**भांडारकर**

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या संग्रहातील महत्त्वाची हस्तलिखितं, ग्रंथ आणि मौल्यवान वस्तूंचं तसंच संशोधन प्रकल्पांचं "ज्ञानसागर" हे प्रदर्शन उद्यापासून सुरु होत आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन यांनी याबाबत अधिक माहिती दिली…

**गेली शंभर सात वर्षे भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांनी केलेला अभ्यास या प्रदर्शनात पुढे ठेवण्याचा प्रयत्न संस्थेतर्फे करण्यात येईल. यातील वैशिष्ट्ये म्हणजे सर्वसामान्य जनतेची उत्सुकता जागृत होईल अशा प्रकारच्या हस्तलिखितं तसंच महाभारतात दाखवलेले काही योद्धाचे व्यूह महाभारतातल्या ज्या चिकित्सक आवृत्ती आहेत त्या तसेच शास्त्रीय वापर भारतीय ज्ञान परंपरेला किती महत्त्व होतं. पायथागोरसच्या सिद्धांतापासून सर्वांचा उल्लेख कसा होता आणि त्या पद्धतीचं संयंत्र एक प्रदर्शन तसंच पुरातन वस्तूंचं कन्झर्वेशन कसं करावं आणि नाट्यशास्त्रापासून ते आयुर्वेदापर्यंत ग्रंथसंपदा संपूर्णपणे पाहता येईल आणि काही संस्थेची प्रकाशनं विकत घेता येतील.**

**दहावी**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात होत आहे. या परीक्षेसाठी 16 लाख 15 हजार 489 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. पुणे, मुंबई, नागपूरसह नऊ विभागीय मंडळांतील एकंदर 5 हजार 111 केंद्रांवर येत्या 18 मार्चपर्यंत ही परीक्षा घेण्यात येईल. मंडळानं प्रसिद्ध केलेलं अधिकृत वेळापत्रकच ग्राह्य धरावं, असं आवाहन राज्य शिक्षण मंडळानं केलं आहे.

**नक्षल्यांची-स्मारके**

गडचिरोली जिल्ह्यामधील दुर्गम भागातील जंगलात नक्षल्यांनी उभारलेली 44 स्मारकं पोलिसांनी बुधवारी उद्ध्वस्त केली. पोलिसांची सी-60 पथके, केंद्रीय राखीव दल, बॉम्ब शोधक आणि नाशक पथकं आणि जिल्हा पोलिसांच्या 18 पथकातील 800 जवानांनी विशेष अभियान राबवून जंगलाच्या वेगवेगळ्या भागात उभारलेली ही स्मारकं एकाच दिवशी नष्ट केली. जिल्ह्यातील नक्षल चळवळ जवळपास संपली असून ही स्मारकं उद्ध्वस्त केल्यानं आता सामान्य नागरिकांच्या मनात असलेली भीती नष्ट होण्यास मदत झाली आहे. नागरिकांमध्ये सुरक्षिततेचं वातावरण निर्माण करण्यासाठी पोलिस दल प्रयत्नशील असल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं. या कारवाईबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली पोलिस दलाचं अभिनंदन केलं आहे. ही कारवाई गडचिरोलीतील बदलत्या वास्तवाचं प्रतीक आहे. भीतीकडून विश्वासाकडे, हिंसेकडून विकासाकडे होणाऱ्या संक्रमणाचा हा निर्णायक टप्पा आहे, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**महावीर जयंती सुट्टी**

जैन धर्माचे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीला शासकीय सुट्टी जाहीर केली जाते. मात्र, अनेक शाळा ही सुट्टी देत नसल्याची खंत अरिहंत जागृती मंचानं व्यक्त केली आहे. शासकीय निर्णयानुसार ही सुट्टी जारी करावी आणि ज्या शाळा सुट्टी देणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करावी, असं निवेदन, अरिहंत जागृती मंचाचे अध्यक्ष राजेंद्र सुराणा यांनी राज्याच्या शिक्षण विभागाचे आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांना दिलं आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.